शीघ्र टपालाने

क्रमांक : एसडब्ल्यूएम-०३/२००१/प्र.क्र.१५४/भाग-२/फ-६
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १२/१/२००५.

प्रति,
प्रधान मुख्य वनसंरक्षक,
महाराष्ट्र राज्य, नागपूर.

प्र. व. सं. महा. राज्य
नागपूर-४४० ००१.
14 JAN 2005
क्रमांक 9306

विषय :- मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ, नागपूर यांनी दि. ७/२/२००२ रोजी दिलेल्या आदेशातील परिच्छेद १६ (४) च्या अनुषंगाने संपूर्ण राज्यात आरागिरणी धोरणाची एकरुप अंमलबजावणी करण्याबाबत.

संदर्भ : १) शासनपत्र समक्रमांक दिनांक २१/५/२००३
२) मा. महाधिवक्ता यांचे पत्र क्र. एजी/१४८/२००४ दिनांक २७/५/२००४.
३) शासनपत्र समक्रमांक दिनांक ११/१/२००५

महोदय,

दि. १६/७/१९८१ नंतर राज्य शासनाने किंवा मुख्य वनसंरक्षक यांनी दिलेल्या परवान्याच्या आधारावर आरक्षित/संरक्षित वनसीमेपासून १० कि.मी. अंतराच्या आत स्थापित आरागिरण्यांबाबत मा.महाअधिवक्ता यांनी त्यांच्या दि. २७/५/२००४ च्या पत्रान्वये शासनाने उपस्थित केलेल्या मुद्दयांच्या अनुषंगाने दिलेले अभिप्राय व त्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीबाबत आपणांस दि. ११/१/२००५ च्या शासनपत्रान्वये कळविण्यात आले आहे.

२. मा. महाधिवक्ता यांनी त्यांच्या दि. २७/५/२००४ च्या पत्रान्वये शासन किंवा मुख्य वनसंरक्षक यांच्या व्यतिरिक्त इतर वनअधिकाऱ्यांनी दि. १६/७/१९८१ नंतर ज्या आरागिरण्यांना परवाने दिले आहेत त्यांचे परवाने नैसर्गिक न्यायाचे तत्त्व अंगीकारुन रद्दबातल करणे आवश्यक असल्याचे अभिप्राय दिलेले आहेत. या अनुषंगाने आपणांस शासनपत्र समक्रमांक दि.११/१/२००५ अन्वये शासन किंवा मुख्य वनसंरक्षक यांच्याव्यतिरिक्त इतर वनअधिकाऱ्यांनी दि. १६/७/१९८१ नंतर ज्या आरागिरण्यांना परवाने दिले आहेत त्यांचे परवाने निरस्त करण्यात यावेत. परंतु असे परवाने निरस्त करण्यापूर्वी नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वाचे पालन करण्यात यावे, असे कळविण्यात आले आहे.

३. या मुद्दयांच्या अनुषंगाने शासन किंवा मुख्य वनसंरक्षक यांच्याव्यतिरिक्त इतर वनअधिकाऱ्यांनी दि.१६/७/१९८१ नंतर ज्या आरागिरण्यांना परवाने दिलेले आहेत. त्यांचे परवाने निरस्त करण्यापूर्वी नैसर्गिक न्यायाचे तत्त्व अंगीकारुन अशा आरागिरणी धारकांचे म्हणणे ऐकून घेणे आवश्यक आहे. सदर आरागिरणी धारकांचे म्हणणे मुख्य वनसंरक्षक (संरक्षण), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी ऐकून घेऊन त्यावर त्यांनी निर्णय घ्यावा. मुख्य वनसंरक्षक (संरक्षण), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचा निर्णय मान्य नसणाऱ्या आरागिरणी धारकांनी त्यांच्या निर्णयाविरुध्द शासनाकडे अपील करावे.

आपला

(आ.वि.आष्टेकर)
सहसचिव (वने)
महसूल व वन विभाग

प्रत : मुख्य वनसंरक्षक (संरक्षण), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.

DARBPALI Letter 89 1/12/05Wed, Jan 12, 2005 Com